**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव**
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००९/६३०/प्र.क्र.३९/२००९/का.१, दिनांक :- २६ फेब्रुवारी, २००९.

# अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

राजस्थानी सम्मेलन, सर्वोदय बालिका विद्यालय परिसर, स्वामी विवेकानंद रोड, मालाड (प), मुंबई या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.८.१२.२००८ रोजी अर्ज सादर केला होता. दि.१०.२.२००९ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या भाषिक (हिंदी) अल्पसंख्याकांमधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भाषिक (हिंदी) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

(टी. एफ. थेकेकरा)
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

## Government of Maharashtra
### Competent Authority and Chief Secretary

*Minority Development Department*
*Mantralaya, Mumbai 400 032.*

*No Ashais-2009/630/pra kra 39/2009/ka 1* *Date 26 February 2009*

## Certificate of Recognition of Minority Status

*Rajasthani Sammelan, Sarvodaya Balika Vidyalaya Complex, Swami Vivekanand Road, Malad (West) Mumbai had applied on 08.12.2008, for a certificate of recognition to their institution as Linguistic Minority Educational Institution. On the basis of a representation made by the office bearers of the institution during the course of personal hearing before me on 10.02.2009, I am satisfied that the above institution is established and being run by persons from Linguistic (Hindi) Minority persons/group of persons as per the criteria declared by the Government by Minority Development Department, GR No Ashais-2009/630/pra kra 39/2009/ka 1, dated 4th July 2008. As a result the aforesaid institution is being declared as Linguistic (Hindi) Minority Educational Institution.*

*This applicability of this certificate is limited only to the state of Maharashtra. Linguistic Minority Status granted to this institution will be applicable to all educational institutions run by said institution*

*The status of Linguistic Minority granted to the aforesaid institution will be legally effective with effect from academic year 2008-09. Consistent and methodical compliance of the criteria and conditions laid under Minority Development Department, GR No Ashais-2009/630/pra kra 39/2009/ka 1, dated 4th July 2008 will be binding on the institution*

*Sd/-*
*T F Thekekara*
*Competent Authority and Chief Secretary*
*Minority Development Department*
*Mantralaya, Mumbai 400 032.*

Seal of Minority Development Department Government of Maharashtra

ATTESTED BY ME
LALTAPRASAD P. DUBEY
ADVOCATE & NOTARY Govt. Of India
Reg. No:. 15300
Greater Mumbai & Thane